



# डॉ करुणा गोखले यांचे 'Women at Workplace' या विषयावर व्याख्यान

महिलादिनाचे औचित्य साधून  मास कॉम विभागातर्फे डॉ करुणा गोखले यांचे 'Women at Workplace' या विषयावर व्याख्यान ठेवले होते. कार्यक्रमाला प्रभारी कुलगुरु डॉ गीताली टिळक उपस्थित होत्या . त्यांनी माध्यमातील महिला या विषयी आपले निरीक्षण नोंदवले. डॉ गोखले यांनी नोकरी करणाऱ्या  सर्व स्तरातील महिला आणि त्यांचे प्रश्न त्यांनी छान समजावून सांगितले . जागतिक स्तरावरील स्त्रीचे चित्र ही त्यांनी सविस्तर रेखाटले. तिला मिळणारे वेतन, पाळणाघराची गैरसोय त्यामुळे अर्थार्जन करणाऱ्या महिलांचे कमी होणारे प्रमाण यावरही त्यांनी विवेचन केले . एक अतिशय वेगळा पण पटणारा मुद्दा  त्यांनी मांडला तो म्हणजे घर   सांभाळणे हे महाकर्मकठीण काम आहे हे चतुर पुरुष लगेच ओळखतात . त्यामुळे तू नोकरी करायची गरज नाही तू घराकडे बघ असे सांगून ते तिला घराच्या दावणीला बांधतात . पण  ते हे लक्षात घेत  नाहीत की केवळ घर चालवणे या पलिकडे जाऊन स्त्रियांना आर्थिक स्वावलंबन हवे असते  तेच हे पुरुष या निमित्ताने हिरावून घेतात .मूलभूत शारिर गरजेसाठी  Right to Pee सारखी चळवळ आज उभारावी लागणे हे आपल्या समजासाठी किती लांच्छनास्पद आहे याची जाणीव करुन देत  त्यांनी श्रोत्यांना अंतर्मुख केले .